## महत्त्वाचे

### मुख्याध्यापकांची सोमवारपासून बैठक

औरंगाबाद : जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची बैठक सोमवारपासून सलग तीन दिवस आयोजित केली आहे. या बैठकांमध्ये अल्पसंख्याक मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी नियोजन केले जाणार असून, बैठकीस मुख्याध्यापकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी लता सानप यांनी केले आहे. सिडको एन-४ येथील 'एमआयटी' हायस्कूलमध्ये रोज तीन दिवस दुपारी १२.३० वाजता या बैठकांचे आयोजन करण्यात आले असून, २८ नोव्हेंबर रोजी सोमवारी सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांसाठी, २९ नोव्हेंबर रोजी सर्व व्यवस्थापनाच्या माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांसाठी, तर ३० नोव्हेंबर रोजी २८ व २९ नोव्हेंबर रोजी बैठकीस उपस्थित न राहू शकलेल्या मुख्याध्यापकांसाठी बैठक आयोजित करण्यात आली आहे.

## दैनंदिनी

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :** फुले-शाहू- आंबेडकर कॉम्पिटेटिव्ह अॅकडमीतर्फे बहुजन समाजातील गरीब व होतकरू मुला- मुलींसाठी मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन. स्थळ- बुद्धविहार भीमनगर, भावसिंगपुरा. वेळ - सकाळी ११ ते ३ वा.

**राष्ट्रीय अधिवेशन :** पुरुष हक्क संरक्षण समितीतर्फे आयोजित १९ व्या राष्ट्रीय अधिवेशनात कुटुंबाच्या हक्कासाठी पुरुष हक्क समिती, कौटुंबिक कायद्यात बदलाची गरज, अन्यायग्रस्त व्यक्तींना कायदेविषयक सल्ला या विषयांवर सकाळी १० वाजेपासून चर्चासत्र, दुपारी ३ वा. मनोगत व सायं. ४ ते ५ या वेळेत समारोप. स्थळ- महसूल प्रबोधिनी सभागृह, दूध डेअरीजवळ.

**कविता संग्रहाचे प्रकाशन :** प्रा. गौरी अभय कल्लावार लिखित 'मनपाखरू' या कविता संग्रहाचे प्रकाशन. हस्ते- कविवर्य फ. मुं. शिंदे, अध्यक्ष- प्रा. मनोहर धोंडे, स्थळ - स्पेस ऑलिम्पिया बिल्डिंग, दुसरा माळा, सूतगिरणी चौक, गारखेडा. वेळ - सकाळी ११ वा.

**बैठक :** अठराव्या वधू-वर परिचय मेळाव्याचा हिशोब सादर करण्यासाठी औरंगाबाद जिल्हा गुरव समाज मंडळ, महिला मंडळ व युवक मंडळाची संयुक्त बैठक. स्थळ- नागेश्वर मंदिर, नागेश्वरवाडी, वेळ - सायं. ५ वा.

**विपश्यना परिचय सत्र :** पालक व शिक्षकांसाठी विपश्यना परिचय सत्रात गोयंका गुरुजींचे ऑडिओ प्रवचन. स्थळ- जरीवाला यांचा बंगला, शांतिनिकेतन कॉलनी. वेळ - सकाळी ९ ते १० वा.

**प्रकाशन :** सदाचार संवर्धक संस्थेच्या स्वगत दिवाळी अंकाचे प्रकाशन. हस्ते- प्रा. श्रीकांत काशीकर. स्थळ - श्रीराम मंदिर, उल्कानगरी. वेळ - सायं. ५ वा.

**संगीत भागवत कथा :** प्रकाश महाराज मुळे, गोंदीकर यांच्या वाणीतून सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत संगीत भागवत कथा व रात्री ८ ते १० यावेळेत श्री साई महिला भजनी मंडळाचा कार्यक्रम. स्थळ - वज्र हनुमान मंदिर, हडको एन-११, सुदर्शननगर.

पाठराखण : दलित वस्ती योजनेत कोट्यवधींचा घोळ

# जि.प.ने गुंडाळला बृहत आराखडा

विजय सरवदे ● औरंगाबाद

**मागासवर्गीयांचे** सामाजिक जीवन व राहणीमान उंचवावे, या हेतूने दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी मिळतो. मात्र, काही गावपुढारी व जि. प. पदाधिकाऱ्यांच्या हातचलाखीमुळे आजपर्यंत या निधीचा हेतू साध्य झालेला नाही. औरंगाबाद जिल्हा परिषदेने तर मागील दोन वर्षांपासून या योजनेचा बृहत आराखडाच गुंडाळून ठेवला असून, मनमानीपणे या योजनेच्या निधीची विल्हेवाट लावली असल्याच्या काही धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत.

तत्कालीन समाजकल्याण अधिकारी जयश्री सोनकवडे यांच्या कार्यकाळात (२०१२-१३) दलित वस्ती सुधार योजनेसाठी पाच वर्षांचा बृहत आराखडा तयार करण्यात आला होता. बृहत आराखडा हा २०११ च्या जनगणनेनुसार दलितांची लोकसंख्या समोर ठेवून तयार करण्यात आलेला आहे. मात्र, अलीकडे या बृहत आराखड्याची मोडतोड करण्यात आली असून, प्रस्तावात दलितांची लोकसंख्या वाढवून निधी लाटण्याचे नवे फंड जिल्हा परिषदेत रुजत आहे. या बृहत आराखड्यामध्ये जिल्ह्यात दलितांची एकूण संख्या सुरुवातीलाच नमूद करण्यात आलेली आहे; पण गावांसमोर नमूद करण्यात आलेल्या आकड्यांची बेरीज मात्र जुळत नाही. गावांमध्ये दलितांची लोकसंख्येच्या अनेक पटीने संख्या जास्त दाखवून गेल्या वर्षी तब्बल ७९ लाख रुपयांचा जादा निधी लाटण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, या प्रकरणाची चौकशी सध्या 'सीईओ' मधुकर अर्दड हे करीत आहेत. चौकशीत असे प्रकार यापूर्वी किंवा अलीकडे झाले आहेत काय? याचाही शोध अर्दड यांनी घ्यावा, अशी मागणी काही सदस्यांनी केली आहे.

या योजनेंतर्गत दलित वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा जसे की, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, विहीर, सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, स्वच्छताविषयक सोयी, मलनिस्सारण, वीज, वस्तीला जोडणारे रस्ते, समाजमंदिर आदी कामे करण्यात येतात. जिल्हा परिषदेत समाजकल्याण विषय समिती ही मासिक बैठकीमध्ये प्राप्त प्रस्तावांची निवड करीत असते. यंदाच्या आर्थिक वर्षात ४८४ गावांतील दलित वस्त्यांसाठी ५७४ प्रस्ताव प्राप्त झाले होते. यापैकी २९४ प्रस्ताव समितीने निवडले असून, त्यांना प्रशासकीय मान्यताही दिली आहे. उर्वरित १८९ परिपूर्ण प्रस्तावांना समिती मान्यता देऊ शकली असती; पण ती दिली नाही. प्रामुख्याने समाजकल्याण विषय समिती सदस्यांच्या प्रस्तावांना प्राधान्य दिले जाते. अन्य सदस्यांच्या प्रस्तावांना मात्र सर्रासपणे केराची टोपली दाखविली जाते. ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आणि शासनाकडून मिळालेला कोट्यवधी रुपयांचा निधी सत्कारणी लागण्यासाठी 'सीईओ' अर्दड यांनी या प्रकरणाची बारकाईने चौकशी करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

### लोकसंख्या आणि मिळणारा निधी

| लोकसंख्या | अनुदान रक्कम |
|---|---|
| 10 ते 25 | 2.00 लाख |
| 26 ते 50 | 5.00 लाख |
| 51 ते 100 | 8.00 लाख |
| 101 ते 150 | 12.00 लाख |
| 151 ते 300 | 15.00 लाख |
| 301 च्या पुढे | 20.00 लाख |



# शहरवासीयांनी अनुभवला मंगलयानाचा थरार...!

रितू करिधल : यशस्वी अभियानाची दिली माहिती

**औरंगाबाद : जगातील** मोजक्याच देशांना अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात गगनभरारी घेण्याची संधी मिळाली आहे. अनेक मोठ्या देशांनी वारंवार प्रयत्न करूनही मंगळ ग्रहावर यान पाठविता आले नाही. २४ सप्टेंबर २०१४ रोजी भारताच्या वैज्ञानिकांनी एकाच प्रयत्नात आपले यान मंगळ ग्रहावर पाठविले. मागील दोन वर्षांपासून हे यान यशस्वीपणे कामही करीत असून, याचा भारताला मोठा फायदा होत असल्याची माहिती शनिवारी इस्रोच्या ज्येष्ठ वैज्ञानिक रितू करिधल यांनी दिली.

तापडिया नाट्यमंदिरात चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड अॅग्रीकल्चर, आस्था फाऊंडेशनच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सीएमआयएचे माजी अध्यक्ष मिलिंद कंक, रितेश मिश्रा, उपाध्यक्ष प्रसाद कोकीळ, अभय हंचनाळ यांची व्यासपीठावर उपस्थित होती.

या व्याख्यानास शालेय विद्यार्थी व खगोलप्रेमींनी अलोट गर्दी केली होती. यावेळी करिधल पुढे म्हणाल्या की, भारताची मंगळ मोहिमेला एम. ओ. एम. मॉम म्हणजे मार्स आर्बिटर मिशन असे नाव देण्यात आले होते. अंतरिक्षयान यापूर्वी ज्या -ज्या राष्ट्रांनी मंगळाच्या मोहिमा राबविल्या, त्यांना पहिल्याच मोहिमेत क्वचितच यश मिळाले. ती गोष्ट भारताच्या वैज्ञानिकांनी साध्य केली. ही भारताची सर्वांत मोठी उपलब्धी म्हणावी लागेल, असेही रितू करिधल यांनी नमूद करताना उपस्थित सभागृहाने टाळ्यांचा एकच कडकडाट केला.

#### कमी पैशात स्वारी



मंगळ मोहिमेच्या यशामुळे ज्यांनी यापूर्वी मंगळ मोहीम यशस्वीपणे राबविली, त्यांच्या रांगेत भारताने स्थान मिळविले आहे. भारतापूर्वी अमेरिका, रशिया आणि युरोपियन युनियन यांनाच हे यश मिळाले आहे. आशियातील कोणत्याही राष्ट्राला हा मान मिळाला नाही. भारताने मंगळावर स्वारी अत्यंत कमी पैशात केली. यासाठी भारतीय बनावटीच्या साहित्याचा वापर करण्यात आला. मंगळ मोहिमेने आपले टप्पे यशस्वीपणे पूर्ण करण्यास सुरुवात केली असल्याचे त्यांनी नमूद केले. या मोहिमेचा हेतू मंगळावर मिथेन वायू उपलब्ध आहे की नाही, याचा शोध घेणे हा आहे. संपूर्ण ब्रह्मांडात केवळ पृथ्वीवरच मिथेन वायू उपलब्ध आहे. मंगळ ग्रहावर वातावरण कसे आहे, तेथे कोणते खनिज पदार्थ उपलब्ध आहेत, हे त्यामुळे समजणार आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरेही त्यांनी दिली.

### चोरट्यास कोठडी

**औरंगाबाद :** लॅपटॉपसह चांदीच्या वस्तू व रोख रक्कम चोरणाऱ्या श्रीरंग ऊर्फ शुभम हिवाळे (२०, रा. विष्णूनगर) याला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ए. ए. जी. एम. शेख यांनी २८ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

## वाणिज्य वार्ता

### 'नारायणा' तर्फे आज चर्चासत्र

**औरंगाबाद : नारायणा** इन्स्टिट्यूटतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही २७ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता सिडकोतील संत तुकाराम नाट्यगृहात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हे चर्चासत्र इयत्ता ७ वी ते १० वीच्या वर्गात शिकणाऱ्या व भविष्यात उच्च ध्येय बाळगण्याची जिद्द ठेवणाऱ्या विद्यार्थी आणि पालकांसाठी आयोजित करण्यात आले आहे.

वाढत्या तंत्रज्ञान आणि सोयी-सुविधांमुळे शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहे. विद्यार्थी, पालकांना सद्य:स्थितीबाबत माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे. याच दृष्टीने या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. यात संस्थेचे डॉ. एम. एफ. मल्लिक व इतर प्राध्यापकवृंद आपल्या अनुभव कौशल्याने उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. चर्चासत्रात प्रामुख्याने फाऊंडेशन कसे मजबूत करावे, दहावीच्या परीक्षेसाठी कोणती काळजी घ्यावी, दहावीनंतर काय व कसे यावर मार्गदर्शन होणार आहे, अशी माहिती संस्थेचे प्रा. विशाल लदनिया यांनी दिली.

# हैं तय्यार हम...

Brought to you by SAFFRON LANDMARKS

Aurangabad Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
11 Dec 2016

Powered by MK CONSTRUCTIONS — CREATIONS FOR LIFETIME



मी धावणार माझ्यासाठी

औरंगाबाद 'स्मार्ट' बनत आहे. त्याला आणखी 'बेटर' बनवायचे आहे. या मॅरेथॉनपासून नवी वाटचाल नवी आशा नवी दिशा याला सुरुवात होणार आहे. शहराच्या विकासामध्ये आणि एकीची भावना निर्माण करण्याच्या हेतूने मी या उपक्रमात सहभागी होणार आहे.
-फईम खान




**एम. के. कन्स्ट्रक्शन्स...** (डावीकडून) विशाल लाहोट, सोमेश लाहोट, जयदीप माल्के, सोनल मराठे, अपूर्वा निकाळजे, श्वेता प्रभुणे, इम्रान शेख, सिद्धेश्वर इंगळे, क्षितिज अग्निहोत्री, फईम खान, कशिश खान, नेहा अग्निहोत्री, ऋग्वेदा मुरुगकर, फारुख खान, उमर खान, विनय राठोड, आरिफ जाफरी, ऋषिकेश , महेश कल्याणकर.




**बागला ग्रुप...** हेता ब्रह्मभट्ट, सरिता लिली, एस. मुजुमदार, कर्नल किरणकुमार, एम. राजपूत, के. आर. आहिरे ( लोकमत आयोजित औरंगाबाद मॅरेथॉन स्पर्धेत बागला ग्रुपने सैन्यदलाच्या १०० लोकांना सपोर्ट देऊन सहभाग नोंदविला आहे.)




**धनेश्वरी प्रतिष्ठान...** (डावीकडून) योगेश पाटील, गजानन भुमरे, रवी देसाई, संतोष पवार, अमर डावकर, एस. एम. काजी, विकास राजूरकर, गणेश डकले, उदयसिंह पाटील, ए. एस. घाडगे, संतोष बिल्लेकर, श्रीकृष्ण दहीवाल, देवेंद्र जोजारे, संजय राठोड.



**स्टायलो ग्रुप...** (डावीकडून) संतोष शर्मा, कृष्णा मोरे, घनश्याम चौहान, अशोक तावरे, रमण लोया, प्रदीप वराडे, लक्ष्मण गोरडे, बाळू कचकुरे, अनिल चव्हाण, कैलास कुटे, विवेक शर्मा.

Co-Sponsors: RAJURI STEEL | SARA INSPIRED BY YOU | श्री धनेश्वरी शैक्षणिक संकुल | VANSH GROUP REALITY BEYOND EXPECTATION | ERA INTERNATIONAL SCHOOL

Powered by: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX - ZEAL | Mall Partner: PROZONE | Food Partner: KREAMN KRUNCH | Outdoor Partner: abhishek advertising & marketing (i) pvt.ltd | Partners: रुचि मसाले | blueumbrella

**नाव नोंदणी व सहभागासाठी**

www.mycitymarathon.com वर ऑनलाईन प्रवेशिका भरू शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४०-६६०४५०२

दुष्काळावर चर्चासत्र : राजाराम देसाई यांचे ठाम प्रतिपादन

# तंत्रज्ञान, लोकसहभाग हाच उपाय

**औरंगाबाद :** दुष्काळासारख्या गुंतागुंतीच्या प्रश्नाची उकल करून त्यावर तोडगा काढण्यासाठी कुणा एका तज्ज्ञावर अवलंबून राहत सरसकट उपायांचा अवलंब करणे योग्य नाही. तंत्रज्ञान, प्रशासन व समाजात समन्वय साधत लोकसहभाग हाच सर्वोत्तम उपाय असल्याचे प्रतिपादन पवई आयआयटीतील तज्ज्ञ राजाराम देसाई यांनी केले.

मसापमध्ये आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रातील पहिल्या सत्रात राजाराम देसाई यांनी 'दुष्काळ आणि वैज्ञानिक दृष्टिकोन'या विषयावर निबंध सादर केला. महाराष्ट्र मागील काही वर्षांपासून सतत दुष्काळाच्या गर्तेत अडकला आहे. गेल्या चार वर्षांत तर कहरच झाला. प्रत्येक वर्षागणिक दुष्काळाची तीव्रता वाढत गेली. यावर्षी तर गेल्या शतकातील सर्वात भीषण दुष्काळाचा सामना केला. राज्यातील ४२ हजार गावांपैकी २९ हजार गावांमध्ये तीव्र टंचाई होती. स्वातंत्र्योत्तर काळात १९७२ साली मोठा दुष्काळ पडला. यानंतर पडलेल्या प्रत्येक दुष्काळावर मात करण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. परंतु दुष्काळ काही हटला नाही. त्याची तीव्रता वाढतच गेली. यासाठी कधी उसाला तर कधी सिंचन क्षमतेला दोषी ठरवत आरोप-प्रत्यारोप करण्यात येतात. त्यामुळे दुष्काळाची मूलगामी चिकित्सा, विचारमंथन होऊन वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक असल्याचे राजाराम देसाई यांनी सांगितले. राज्यात ६०० पेक्षा जास्त लहान मोठ्या तंत्र संस्था आहेत. या संस्थांच्या माध्यमातून दुष्काळावरील स्थानिक परिस्थितीला अनुरूप, तसेच प्रादेशिक उपाय योजनांचे सातत्याने मूल्यमापन करून उपायांची अंमलबजावणी करणे गरजेचे असल्याचेही राजाराम देसाई यांनी स्पष्ट केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी माधवराव चितळे होते, तर डॉ. उमेश बगाडे, डॉ. स्मिता गांधी यांनी चर्चासत्राकडे पाठ फिरविली.



'मसाप'मध्ये आयोजित मराठी साहित्य व दुष्काळ या चर्चासत्रात बोलताना साहित्यिक रंगनाथ पठारे.

#### साहित्याचा धागा दुष्काळाशी जोडा

- रामायण, महाभारत, कौटिल्याच्या काळातही 'पाण्याचा ताण' निर्माण होण्याची पाळी येऊन गेली. आजपर्यंत प्रत्येक पिढीच्या वाट्याला पाणीटंचाईचे वर्ष आले. हवामान बदलाच्या परिणामांमुळे या गोष्टी घडत आलेल्या आहेत. या दुष्काळी प्रसंगांचा धागा साहित्याशी जोडून लेखन झाले पाहिजे, असा सल्ला जलतज्ज्ञ माधवराव चितळे यांनी दिला.
- मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने डॉ. ना. गो. नांदापूरकर सभागृहात 'दुष्काळ आणि मराठी साहित्य' या विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. या चर्चासत्राचे उद्घाटन पर्यावरणतज्ज्ञ माधवराव गाडगीळ यांच्या अनुपस्थितीमुळे माधवराव चितळे यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील होते.
- यावेळी बोलताना माधवराव चितळे यांनी दुष्काळाचे पुराणकाळापासून मराठी साहित्यात उमटलेले प्रतिबिंब उलगडून दाखवले. दुष्काळ, हवामानशास्त्राच्या विश्लेषणाची जबाबदारी साहित्यिकांची असून, वैज्ञानिक तपशील समजून घेऊन त्याचे साहित्यात रुपांतर करण्याचे आवाहनही माधवराव चितळे यांनी यावेळी केले. राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन सत्राच्या प्रास्ताविकात कौतिकराव ठाले पाटील यांनी आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.

**निसर्ग व शेतीची गरज आहे का?**

२१ व्या शतकावर हवामान बदल संकटाचे भयंकर ढग जमा झाले आहेत. लोकसंख्या वाढीचा वेग धडकी भरवणारा असल्यामुळे अन्न, पिण्याचे पाणी व ऊर्जा आणायची कोठून हा प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्याशिवाय पर्याय राहिला नाही. यामुळे आपल्याला निसर्ग व शेतीची गरज आहे का? याचा निर्णय स्वत:शी घेऊन गरज असेल तरच तसे ठाम कृतीतून व्यक्त करण्याची वेळ असल्याचे पर्यावरणतज्ज्ञ अतुल देऊळगावकर यांनी शोधनिबंधातून सांगितले.

**दुपारच्या सत्रातही दुष्काळमंथन**

दुपारनंतर माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षतेखाली रंगलेल्या दुष्काळमंथनाच्या दोन सत्रातही लोकसाहित्यातील दुष्काळावर डॉ. साहेब खंदारे, गाथा सप्तशतीतील दुष्काळावर डॉ. रवींद्र इंगळे, 'मध्ययुगीन साहित्यातील दुष्काळाचे चित्रण' या विषयावर डॉ. विद्याधर पाटांगणकर, डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी 'ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीकेंद्री आणि स्त्रियांचे साहित्य आणि दुष्काळ' या विषयांवर दीर्घ निबंध सादर केला.

### परीक्षा मंडळाला जुन्या नोटांबाबत कर्मचाऱ्यांचे साकडे

**औरंगाबाद : दिवाळीपूर्वीच** माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळाने निर्देश दिल्यानंतर दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळांकडे ५०० व १००० रुपयांच्या नोटांद्वारे परीक्षा शुल्क जमा केले. मात्र, ८ नोव्हेंबर रोजी शासनाने जुन्या नोटा चलनातून बाद केल्यामुळे दिवाळीनंतर बँका शाळांकडून परीक्षा शुल्काच्या जुन्या नोटा स्वीकारायला तयार नाही. मंडळाने यासंबंधी बँकांना सूचना द्याव्यात, अशी मागणी प्रबळ शिक्षकेतर कर्मचारी संघाने केली आहे.

यासंदर्भात काल शुक्रवारी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीने राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष गंगाधर म्हमाने यांच्यासोबत विविध अडचणींबाबत चर्चा केली. यासंदर्भात शाळांनी पालकांकडे नोटा परत घेण्याविषयी आवाहन केले; पण पालक म्हणतात, आम्ही नोटा चलनातून बाद होण्यापूर्वीच शाळांमध्ये जमा केल्या आहेत. नोटा बदलण्याचे काम आता शाळांचे आहे. दुसरीकडे बँकांदेखील शुल्कापोटी जुन्या नोटा स्वीकारत नसल्यामुळे शाळांच्या अडचणीत वाढ झाली आहे. यावर मंडळाने पुढाकार घेऊन बँकांना ऑनलाईन पद्धतीने जनरेट होणारे चलन स्वीकारण्यास सूचना द्याव्यात, या मुद्यांवर म्हमाने यांच्यासोबत चर्चा झाली.

यावेळी पाशूभाई शेख, राजेश देशमुख, सुनील पांडे, कैलास गौतम, हमजा झंडावाला, अशोक हरणे, प्रकाश वाघमारे, दिनेश जोशी, जुनेद कादरी आदी उपस्थित होते.

# लोकमत व व्हीआयटी विद्यापीठातर्फे आज 'फ्युचर मंत्रा सेमिनार'

उपक्रम : ११ वी, १२ वीतील विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन

लोकमत | VIT UNIVERSITY Present FUTURE मंत्रा

**औरंगाबाद : बारावीनंतर** नेमके काय करावे, हा अनेक विद्यार्थ्यांना विचारात टाकणारा प्रश्न आहे. आज करिअर कुठल्याही एक-दोन क्षेत्रांसाठी मर्यादित राहिले नाही. विद्यार्थ्यांना त्यांच्या मनाजोगे करिअर निवडण्यासाठी आता अनेक संधी उपलब्ध आहेत. ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांना करिअरसंबंधी पडणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे व करिअरची माहिती देण्यासाठी 'लोकमत' आणि व्हीआयटी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने २७ नोव्हेंबर रोजी 'फ्युचर मंत्रा' या सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

'लोकमत' भवन येथे सायंकाळी ५ वाजता या सेमिनारला सुरुवात होणार आहे. १२ वीनंतर नेमके काय करावे, कोणते स्पेशलायझेशन करावे, त्यासाठी योग्य इन्स्टिट्यूट कसे निवडावे, अॅडमिशनची पद्धत कशी असणार, त्यासाठी कोणती तयारी करावी लागते. यासारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे 'फ्युचर मंत्रा' कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना मिळणार आहेत. वाढत्या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट करिअर करण्याची युवकांची इच्छाशक्ती असते. या इच्छाशक्तीला योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाली तर यश आपल्याच मुठीत आहे. शिक्षणाच्या या टप्प्यावर पडणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी लोकमतने या सेमिनारद्वारे विद्यार्थ्यांना एक प्रकारचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी हे सेमिनार मार्गदर्शन ठरणार आहे. सेमिनार मोफत आहे. यात गिरीश जोशी व राजा दास हे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. या संधीचा लाभ विद्यार्थी व पालकांनी घ्यावा तसेच अधिक माहितीसाठी ८८५६८००३०१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. सेमिनारदरम्यान विद्यार्थ्यांना भरघोस बक्षिसे जिंकण्याची संधीही मिळणार आहे. उपस्थितांमधून लकी ड्रॉ काढण्यात येतील. विजेत्या विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येतील.


